महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ ११ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १०८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी

## गुरवली स्थानकाबाबत कोणताही निर्णय नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : खडवली आणि टिटवाळा रेल्वे स्थानकादरम्यान गुरवली रेल्वे स्थानक उभारण्यासाठी बऱ्याचदा मागण्या रेल्वे प्रशासनाकडे उपस्थित करण्यात आल्या आहेत. परंतु रेल्वे प्रशासनातर्फे गुरवली रेल्वे स्थानक उभारण्याची कल्पना फक्त रेल्वे प्रवासी संघटनेची आहे. त्याव्यतिरिक्त मध्य उपनगरीय रेल्वे प्रशासनाची या परिस्थिती संबंधित कोणतेही निर्णय घेतल्याचे व विषयासंबंधित प्रतिक्रिया करण्याचे आश्वासन रेल्वे प्रशासनाने दिलेले नाही, असे मुख्य जनसंपर्क अधिकार्याद्वारे सांगण्यात आले आहे. तब्बल 1966 साली माजी खासदार सोनुभाऊ बसवंत यांनी 35 गावच्या सहमतीने गुरवली स्थानक उभारणीसाठी याचिका संसदेत दाखल केली होती. मांडा, टिटवाळा, काळू पाडा, गुरवली, राया, निंबवली, वझुरली, जुगाव, चिराडपाडा, पिसा, वसुंदी, कोंढेरी, मोस, झोर, आणा, वावेघर, उतणे, आंबिवली, फाळेगाव, मढ, रुंदा, बैलपाडा, भोंगळ पाडा, दानबाव, चिंचवली, नडगाव, उशीद, हाल, आंबर्जे, आमना, सांगोडा, सावाद, किरवली, इताडे, मुठवाल इत्यादी गावाच्या पदाधिकारी आणि ग्रामस्थांसह मागणी मध्य उपनगरीय रेल्वे प्रशासनाकडे करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा 2001 साली, माजी खासदार रामभाऊ कापसे आणि रामभाऊ मालगे यांनी रेल्वे मंत्र्यांना गुरवली स्थानक उभारणी विषयी नव्याने मागणी केली होती.

## बोगस सिमेंट कारखान्याची पोलखोल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्व कडील रेल्वेच्या गोदामात जमा होणाऱ्या नामांकित कंपनीच्या सिमेंट च्या बॅग मध्ये निष्कृष्ट दर्जाचे सिमेटची भेसळ करून विक्रीसाठी पाठवले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. निष्कृष्ट दर्जाचे सिमेंट ची भेसळ करून नामांकित कंपनीच्या नावाने विक्री करण्याचा गोरखधंदा करणाऱ्या कंपनीचा जागरूक नागरिकानी पर्दाफास करून पोलिसांना माहिती दिल्याने पोलिसांनी तत्काळ छापा मारून भेसळ युक्त सिमेंट ने भरलेले चार ट्रक सह चार लाखाचा माल जप्त केला. बनावट वस्तू तयार करून विक्री करण्याचे प्रमाण वाढले आहे. अगदी खाद्य पदार्थांचे देखील बनावट पदार्थ तयार करून ते नामांकित कंपनीच्या पॅकिंगमध्ये भरून विक्री केले जात असल्याचे प्रकार समोर आले आहे. आता अशाच प्रकारे बनावट सिमेंट तयार करण्याचा प्रकार कल्याण पूर्वमध्ये उघड झाला आहे.

## बांधकामासाठी डायनामाइटचा स्फोट

### ■ भिवंडीत इमारतींना तडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १० (बातमीदार)** अशोकनगर येथील निवासी संकुलाजवळ सुरू असलेल्या नवीन बांधकामासाठी खडक फोडण्यासाठी डायनामाइटचा वापर केल्यामुळे येथील एका सात मजली इमारतीच्या आरसीसी खांबांना आणि भिंतींना तडे गेल्याची घटना समोर आली आहे. यामुळे इमारतीमधील रहिवाशांना धोका निर्माण झाला असून, त्यांनी पालिका प्रशासनाकडे तक्रार केली आहे.शक्ती ग्रुप बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांच्या इमारतीच्या बांधकामादरम्यान २७, २८ आणि २९ नोव्हेंबर २०२४ रोजी डायनामाइट ब्लास्टिंग केल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. रहिवासी अभिषेक कोठारी यांनी या गंभीर प्रकाराची तक्रार महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त यांच्याकडे केली आहे.

तक्रारीची दखल घेत प्रभाग समिती क्रमांक दोनचे सहाय्यक आयुक्त माणिक जाधव यांनी जागेवर पाहणी केली. त्यांनी ब्लास्टिंगचा वापर झाल्याच्या माहितीला दुजोरा दिला. महापालिकेच्या आयुक्तांच्या आदेशानुसार पालिका उपायुक्त विक्रम दराडे यांनी शांततानगर पोलिस ठाण्यास पत्र देऊन स्फोटक द्रव्यांचा वापर झाला किंवा कसे, याची तपासणी करण्यास सांगितले आहे. महसूल विभागाकडूनही या घटनेची चौकशी होणार आहे. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू असून अशोकनगर येथील शक्ती ग्रुप बिल्डर्स अँड डेव्हलपर्सच्या दोन्ही कार्यालयांत जाऊन व्यवस्थापनाशी 'सकाळ'च्या प्रतिनिधींनी संपर्क साधला असता तेथे व्यवस्थापक आणि संचालक उपस्थित नसल्याचे व भेट होणार नसल्याचे कार्यालयीन व सेल कर्मचाऱ्यांनी सांगितले.

# ओबीसी आरक्षणाला किंचितही धक्का लागणार नाही ! - महसूलमंत्री बावनकुळे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नागपूर** - ओबीसी आरक्षणाला किंचितही धक्का लागणार नाही, सरकार ओबीसींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे, याची खात्री बाळगा असा विश्वास पुन्हा एकदा महसूलमंत्री व ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, ओबीसींच्या आरक्षणाचा मुद्दा व कुणबी मराठासंदर्भातील काढलेल्या शासन आदेशावरून सर्वपक्षीय शिष्टमंडळाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी ओबीसी आरक्षणाला किंचितही धक्का लागणार नाही. सरकार ओबीसींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे, असे आश्वासन दिले आहे. कुणबी प्रमाणपत्रांबाबत समाजात संभ्रम आहे की बोगस प्रमाणपत्रे निघतील. मी खात्री देतो की, जे खऱ्या अर्थाने पात्र कुणबी मराठा आहेत, केवळ त्यांनाच प्रमाणपत्रे मिळतील. आज नागपुरात ओबीसी मोर्चा निघाला. या पार्श्वभूमीवर कॉंग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी संभ्रम दूर करून घ्यावेत. सरकारकडून काहीही चुकीचे होणार नाही, समितीचा अध्यक्ष म्हणून मी स्वतः व सरकार याबाबत काळजी घेईल असे स्पष्ट केले. एकही प्रमाणपत्र खोटं दिलं जाणार नाही, असे बावनकुळे म्हणाले.

**■ ओबीसी समाजाचं आरक्षण गेलं, त्यावेळी वडेट्टीवार मंत्रीमंडळात होते**

**उद्धव ठाकरे सरकार असताना ओबीसी समाजाचं आरक्षण गेलं, वडेट्टीवार त्यावेळी मंत्रीमंडळात होते. देवेंद्र फडणवीसांनी ओबीसींना पुन्हा आरक्षण मिळवून दिल्याचे बावनकुळे म्हणाले. सत्तेत असताना काही करायचं नाही, आणि सत्ता गेल्यावर कांगावा करायचा. ओबीसी समाजाला कुठलाही धक्का लागणार नाही, असं वचन शिष्टमंडळाला दिलं असल्याचे बावनकुळे म्हणाले. त्यांना अजून खुलासे हवे असतील स्पष्टीकरण हवं असेल तर आम्ही ते करायला तयार आहोत असे बावनकुळे म्हणाले. आम्ही ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. ओबीसी समाजचं हित आमचं सरकार जाऊ देणार नाही असेही बावनकुळे म्हणाले. हा जीआर केवळ हैदराबाद गॅझेट संदर्भात काढलेला आहे. केवळ मराठवाड्यापुत मर्यादित आहे. राज्यात कुठेही हा जीआर लागू नाही असे बावनकुळे म्हणाले. त्यामुळं ओबीसी समाजाची दिशाभूल थांबवली पाहिजे असे ते म्हणाले.**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष

## भरत (भाऊ)गोंधळे यांना जीवे मारण्याची धमकी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**कल्याण** : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ठाणे जिल्हा ग्रामीण चे अध्यक्ष भरत(भाऊ)गजानन गोंधळे यांना जीवे ठार मारण्याची धमकी अंबरनाथ येथील विजय मोर्या यांनी दिली असून या विरोधात कल्याण तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून यामुळे म्हारळ, वरप, कांबा परिसरासह सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. कल्याण तालुक्यातील वरपगाव चे भरत(भाऊ)गजानन गोंधळे हे गेल्या कित्येक वर्षांपासून अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून पक्षाचे उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहेत, गावचे सरपंच पदापासून ते कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, आणि आता जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष म्हणून काम करत आहेत. अंबरनाथ येथील पक्षाचे कार्यकर्ते विजय मोर्या याला श्री गोंधळे यांनी अंबरनाथ शहराचे कार्याध्यक्ष या पदावर नियुक्त केले होते. परंतु यांनी वारंवार पक्षविरोधी कारवाया, व सातत्याने पक्षशिस्तीचा भंग करत असल्याच्या तक्रारी कार्यालयात प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे गैरवर्तन व बे जबाबदार पणा यामुळे त्याला नुकतेच निलंबित करण्यात आले होते. गोंधळे हे पक्षाचे काम आटोपून वरप येथे घरी आले असता त्यांच्या मोबाईल वर फोन आला, तो त्यांनी न उचलल्याने नंतर वँटसफ वर मँसेज व व्हाईस कॉल वर तूला जिंवत ठेवणार नाही, मी नरेश गायकवाड चा माणूस आहे, तूला संपवणार, अशा धमक्या व अत्यंत अश्लील शिवीगाळ केल्याचा आरोप जिल्हाध्यक्ष भरत गोंधळे यांनी केला आहे. यामुळे परिसरात संताप पसरला आहे. त्यामुळे अशा विकृत माणसाला पोलिसांनी ताबडतोब अटक करावी अशी मागणी होत आहे.

# टायर कंपनीला परवानगी ?

### ■ ग्रामसेवकाविरोधात गावकऱ्यांचा संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा : एकीकडे टायर रिसायकलिंग आणि रिट्रेडिंग कंपन्यांनी संपूर्ण वाडा तालुक्याचे आरोग्य बिघडवले असतानाच तालुक्यातील आब्जे येथे टायर कंपनीला परवानगी देणाऱ्या ग्रामसेवकाविरोधात गावकऱ्यांच्या संतापाचा भडका उडाला. गावकऱ्यांनी पंचायत समितीजवळ असलेल्या ग्रामपंचायत अधिकारी संखे यांचा पाठलाग केला, त्यांना पकडले आणि पंचायत समिती कार्यालयात आणून डांबून ठेवले. गावकऱ्यांचा रुद्रावतार पाहून ग्रामपंचायत अधिकाऱ्याची पुरती तंतरली आणि त्यांनी बाबापुता करत पुन्हा ग्रामसभा घेण्याचे जाहीर केले. त्यानंतरच त्यांची सुटका झाली.**



वाडा तालुक्यात सुमारे ६० टायर कंपन्यांचे प्रदूषण गावकऱ्यांच्या जीवावर उठले आहे. टायरवर प्रक्रिया करताना वातावरणात निर्माण होणाऱ्या कार्बनमुळे अनेकांना फुफ्फुसाचे विकार झाले आहेत. अनेक गावकऱ्यांची नखे काळवंडली आहेत. पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. त्यातच आता आब्जे गावात पच्युएट रिसायकलिंग सोल्यूशन नावाचा नवीन टायर कारखाना येऊ घातला आहे. या कंपनीला गावकऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे. मात्र ग्रामपंचायतीची समिती आणि ग्रामविकास अधिकारी यांनी गावकऱ्यांचा विरोध डावलून या कारखान्याला परवानगी दिली. त्यामुळे गावकऱ्यांच्या संतापाचा भडका उडाला.

गावकऱ्यांनी थेट पंचायत समिती गाठली. पंचायत समिती कार्यालयाजवळच ग्रामपंचायत अधिकारी परेश संखे उपस्थित होते. गावकऱ्यांचा रुद्रावतार पाहून संखे यांनी पळ काढला, परंतु ग्रामस्थांनी त्यांचा पाठलाग केला आणि त्यांना पकडून पंचायत समिती कार्यालयात आणले व डांबून ठेवले. पुन्हा ग्रामसभा लावा आणि टायर कंपनीला दिलेली परवानगी रद्द करा अशी मागणी ग्रामस्थ जितेश म्हस्कर आणि तेजस म्हस्कर यांनी केली. त्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी संखे यांनी नमते घेतले. पुन्हा ग्रामसभा घेईन, गावकऱ्यांची मते जाणून घेईन आणि त्यानंतरच पुढचे ठरवू असे संखे यांनी सांगितल्यानंतरच गावकऱ्यांनी त्यांची सुटका केली.

## विद्युत कर्मचारी कृती समितीचा संप स्थगित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पुणे** : महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीच्यावतीने विविध मागण्याबरोबरच तीनही कंपन्यांचे खासगीकरणाचा शासनाने घातलेला घाट याच्या विरोधात कृती समितीच्यावतीने राज्यात 72 तासांचा संप पुकारण्यात आला होता. मात्र व्यवस्थापनाने कृती समितीतील संघटनांना केलेल्या आवाहनाचा आदर राखून तसेच 14 आणि 15 ऑक्टोबर रोजी कृती समितीतील संघटना बरोबर वाटाघाटीची तारीख निश्चीत केली आहे. ही बाब लक्षात घेऊन कृती समितीने संप स्थगित केला आहे, असे कृती समितीने प्रसिध्दिपत्रकाव्दारे कळविले आहे.

# अन्न व औषध प्रशासनाची परिस्थिती चिंताजनक !




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. १० :** महाराष्ट्रातील अन्न व औषध विभागाची परिस्थिती चिंताजनक आहे. १३ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यात औषधांची गुणवत्ता आणि सुरक्षितता देखरेख करण्याची जबाबदारी केवळ ४५ औषध निरीक्षकांवर आहे. एकूण २०० मंजूर पदांपैकी १५५ पदे वर्षानुवर्षे रिक्त आहेत, ज्यामुळे प्रत्येक औषध निरीक्षकावर अंदाजे ३० लाख नागरिकांची औषध सुरक्षा सुनिश्चित करण्याचा ताण आहे. दरम्यान, कफ सिरपमुळे झालेल्या बालकांच्या अलीकडील मृत्यूंमुळे आधीच ताण वाढलेल्या यंत्रणेवर आणखी तणाव वाढला आहे.

राज्यात औषध उद्योग वाढत असतानाही, रिक्त असलेल्या औषध निरीक्षकपदांसाठी भरती प्रक्रिया बऱ्याच काळापासू रखडलेली आहे. या असमानतेचा थेट परिणाम सार्वजनिक आरोग्यावर होत आहे. बनावट आणि निकृष्ट औषधांना आळा घालणे, फार्मसीची तपासणी करणे आणि उत्पादकांची नियमित तपासणी करणे यासारख्या महत्त्वाच्या कामांवर परिणाम होत आहे. परिणामी, बाजारात निकृष्ट औषधांचा मुक्तपणे प्रसार होण्याचा धोका वाढला आहे आणि जेव्हा एखादा मोठा खटला शेवटपर्यंत पोहोचतो, तेव्हाच कारवाई केली जाते. औषध गुणवत्ता तपासणी अधिकारी म्हणून एकूण २०० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १०० पदांसाठी जाहिरात काढली गेली आहे. सद्यस्थितीत ४५ पदे कार्यरत आहेत. ही पदे काही महिन्यांत भरली जातील, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

**■ मनुष्यबळासह सुविधांचा अभाव**

**एफडीएच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, ही परिस्थिती रिक्त पदांपुरती मर्यादित नाही, तर विद्यमान पायाभूत सुविधा आणि संसाधनेदेखील अपुरी आहेत. अनेक औषध निरीक्षकांकडे आवश्यक चाचणी किट, पुरेशी वाहने किंवा जलद नमुना चाचणीसाठी सुविधांचा अभाव आहे. परिणामी तपासणी केवळ औपचारिकता बनते.**









## विद्यार्थी गळफास प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा

### आदिवासी आधार फाऊंडेशनची निवेदनाद्वारे मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** कै. दिगंबर पाडवी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा आंबिस्ते येथील इयत्ता नववी व दहावीत शिकणारे दोन विद्यार्थी कु. देविदास परशुराम नवले (वय १५ वर्ष) आणि मनोज सीताराम वड (वय १४) ह्यांनी 8 ऑक्टोबर च्या मध्यरात्रीच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

तालुक्यात अशा पद्धतीची घटना घडणं हे अत्यंत दुर्दैवी असून संतापजनक आहे. सदरील घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असताना तपासात कुठलंही राजकारण न आणता घटनेची निपक्षपातीपणे चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी वाडा तहसीलदार व वाडा पोलीस निरीक्षक ह्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. पिडीत विद्यार्थ्यांना, त्यांच्या कुटुंबियांना न्याय द्या अन्यथा आंदोलन करू असा ईशारा निवेदनात देण्यात आला आहे.

ह्यावेळी संघटनेचे अध्यक्ष कल्पेश ठाणगे, आदिवासी मुक्ती मोर्चाचे अनंता वनगा, मा. सभापती योगेश गवा, कृष्णा जाधव, सचिन शिंगडा, ॲड. नितेश म्हसे, ॲड. कपिल पाटील, मनोज बुंधे तसेच तालुक्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पोलिस हवालदाराला लाच प्रकरणी अटक

### लाच लुचपत विभागाची मोठी कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पॉक्सो (POCSO) कायद्यांतर्गत कारवाई न करण्यासाठी आणि मदतीच्या मोबदल्यात तब्बल ५ लाख रुपयांची लाच मागणाऱ्या पोलिस हवालदाराला रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली आहे. आरोपी लोक सेवक याने पहिल्या हप्त्यापोटी ३ लाख रुपये स्वीकारताना लाचलुचपत विभागाच्या सापळ्यात अडकला. ही कारवाई १० ऑक्टोबर २०२५ रोजी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास करण्यात आली असून, आरोपीचे नाव विशाल वाघाटे (पो.ह. क्र. ९६१) असे आहे. तो पोलीस मुख्यालय, अलिबाग येथे कार्यरत होता.

एका ३० वर्षीय पुरुष तक्रारदाराने ८ ऑक्टोबर रोजी लाच मागणीची तक्रार अँटी करप्शन ब्युरोकडे केली होती. त्यानंतर ९ ऑक्टोबर रोजी लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. आरोपीने ५ लाख रुपये लाचेची मागणी केली असून, पहिला हप्ता म्हणून ३ लाख रुपये स्वीकारण्याचे निश्चित झाले. १० ऑक्टोबर रोजी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास महाड शहरात ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून पैसे घेत असताना विशाल वाघाटे याला रंगेहाथ अटक करण्यात आली. या प्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी**

ही सापळा कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सापळा पथकामध्ये पो.नि. निशांत धनवडे, पो.नि. नारायण सरोदे, तसेच सहा फौजदार विनोद जाधव, अरुण करकरे, सुषमा राऊळ यांच्यासह अन्य पोलिसांचा सहभाग होता. मार्गदर्शन अधिकारी म्हणून अँटी करप्शन ब्युरो ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे आणि सुहास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

रायगड अँटी करप्शन ब्युरोने नागरिकांना आवाहन केले आहे की, "कोणताही शासकीय अधिकारी, कर्मचारी अथवा त्यांच्या वतीने कोणीही शासकीय कामासाठी कायदेशीर शुल्काशिवाय अतिरिक्त पैसे अथवा लाच मागत असल्यास तात्काळ दूरध्वनी: 02141-222331टोल फ्री क्रमांक: 1064,मोबाईल: 9769691064संपर्क साधावा." या कारवाईमुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, भ्रष्टाचारास मुळापासून उखडून टाकण्यासाठी अँटी करप्शन विभाग सतर्क आणि सज्ज आहे.

## भिवंडी महानगरपालिकेच्या परवाना विभागाची एक खिडकी योजना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी महानगरपलिका कार्यक्षेत्रातील विविध व्यावसायीक आस्थापना, कारखाने, गोडाऊन याकरिता महानगरपालिकेकडून ना हरकत दाखला तसेच व्यवसाय परवाना घेणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलमांनुसार बंधनकारक असल्याने महानगरपालिकेच्या वतीने एक खिडकी योजना सुरु करण्यात येत आहे. या करिता नोडल अधिकारी म्हणून उपआयुक्त (परवाना) यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.

भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध व्यावसायीक आस्थापना, कारखाने, गोडाऊन धारक यांचा सर्वे करुन ना हरकत दाखला न घेतलेल्या, परवाना नसलेल्या तसेच थकबाकीदार यांना नोटीस बजाविणेची कार्यवाही महानगरपालिकेचे परवाना विभाग प्रमुख यांनी नोडल अधिकारी तथा उपआयुक्त (परवाना) यांचे अधिपत्याखाली करावी,असे आदेश आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांनी दिले आहेत. त्या प्रमाणे यापुढील महानगरपालिका कार्यक्षेत्रातील परवाना, पर्यावरण, अग्निशमन व मालमत्ता कर विभाग इ. सर्व प्रकारचे विविध परवानांचे अर्ज एक खिडकी योजनेतून परवाना विभागात स्विकारण्यात येणार असून यापुढे परवाना विभागातील कर्मचारी व्यवसायीक आस्थापनांकडून मालमत्ता कर थकबाकी वसुल करण्याबरोबरच पर्यावरण व अग्निशमन दाखला तसेच व्यवसाय परवाना फी यांचीही वसुलीची एकत्रित कारवाई करतील. एक खिडकी योजनेतून (परवाना विभागाकडून) प्राप्त होणाऱ्या विविध अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही करुन नियमानुसार परवाना दाखला देणेकरीता परवाना विभागाकडे अर्ज करण्यात यावेत,असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांनी केले आहे,अशी माहिती महानगरपालिकेच्या जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी दिली आहे.

## महेश गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त लोकोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** कट्टर शिवसैनिक झुंजार नेतृत्व म्हणजेच कल्याण पूर्वचे महेश गायकवाड, यांचा वाढदिवस 9 सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. महेश गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभागात अनेक लोकोपयोगी कार्यक्रमचे आयोजन केले होते. प्रभागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप, निबंध स्पर्धा, आणि बक्षिसांचे वाटप करण्यात आले.प्रभागातील गरजू महिलांना शिलाई यंत्राचे वाटप, आनंदाचा शिधा, साडी वाटप, असे अनेक कार्यक्रम आयोजित केले होते. अनेक वर्षापासून गायकवाड आपला वाढदिवस अशाच पद्धतीने करतात.गायकवाड यांचे कार्यकर्ते पदाधिकारी मित्रमंडळी आणि महिला मंडळ आणि स्थानिक नागरिक त्यांच्या पाठीशी नेहमीच उभे असतात, स्वतःहून कार्यात मेहनत घेतात आणि कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडतात. सायंकाळी सहा वाजता कार्यालयाच्या जवळच असलेल्या पटांगणात अनेक कार्यकर्ते आणि मित्रमंडळी सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेकांनी या वाढदिवसाला भेट दिली.

महेश गायकवाड यांनी या सर्वांच्या उपस्थिती केक कापला, यावेळी रागेत उभे राहून महेश गायकवाड यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन आपले प्रेम व्यक्त केले. आणि वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा दिल्या.

## भिवंडीत अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने वकृत्व स्पर्धा संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी महापालिकेचे माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त स्वाभिमान सेवा संस्थेच्यावतीने शालेय विद्यार्थीना प्रोत्साहन देण्यासाठी अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने " स्वाभिमान श्री "आंतरशालेय मराठी वकृत्व स्पर्धा भिवंडी शहरातील धामणकर नाका येथील पद्मश्री अण्णासाहेब जाधव कनिष्ठ महाविद्यालय सभागृहात आज सकाळी आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन मराठी भाषा बाबतीत आपले मनोगत व्यक्त करून उपस्थिताची मन जिंकली. यावेळी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्हे देऊन सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भिवंडी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, माजी नगरसेवक संतोष शेट्टी अदि मान्यवर उपस्थित होते.तर

स्पर्धेचे समन्वयक व मुख्याध्यापक सुधीर घागस,मानसी राजे,उपप्राचार्य देविदास अहिरे,संजय भोईर,हसमुख पटेल, सुजोती वलाल,मिलिंद पळसुले,अभिजित म्हसकर,यांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण आणि विचारप्रधान वकृत्व मनोगत व्यक्त करीत मराठी भाषेबद्दल प्रत्येकाने आदर व प्रेम,अभिमान बाळगला पाहिजे असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे वक्तृत्वकौशल्य पाहून उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक व्यक्त केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वाभिमान सेवा संस्थेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

## राष्ट्रीय खेळाडू अपघातात गंभीर जखमी

### 10 महिने चालणेही मुश्किल आरोपी अद्यापही मोकाटच

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवलीतील प्रसिद्ध धावपटू आणि राष्ट्रीय फुटबॉलपटू लक्ष्मण गुंडप यांना काही दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात गंभीर दुखापत झाली आहे. रस्त्यावरून दुचाकीने जात असताना एका भरधाव कारने त्यांना आणि त्यांच्या मुलाला धडक दिली आणि फरफटत नेले. या अपघाताला जबाबदार असलेला कारचालक घटनेपासून अजूनही फरार असून, डोंबिवली पोलीस त्याला पकडण्यात अपयशी ठरल्याने त्यांच्या तपास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

लक्ष्मण गुंडप हे डोंबिवली पूर्वेतील महात्मा गांधीनगर परिसरात राहतात. ते एक नामांकित धावपटू आणि राष्ट्रीय फुटबॉलपटू म्हणून ओळखले जातात. ते अनेक उदयोन्मुख धावपटूंना मोफत प्रशिक्षण देतात आणि त्यांनी अनेक खेळाडू तयार केले आहेत. हा अपघात काही दिवसांपूर्वी झाला, जेव्हा गुंडप आणि त्यांचा मुलगा जिमखाना रोडवरून क्रीडांगणावर जाण्यासाठी निघाले होते. मुलगा सायकलवर होता आणि गुंडप दुचाकीवर होते. यावेळी विरुद्ध दिशेने आलेल्या एका भरधाव कार चालकाने प्रथम त्यांच्या मुलाला आणि नंतर गुंडप यांना धडक दिली. धडकेनंतर कारचालकाने त्यांना 15 ते 20 मीटर पर्यंत फरफटत नेले आणि त्यानंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. स्थानिकांनी जखमी गुंडप यांना रुग्णालयात दाखल केले. या अपघातात गुंडप यांच्या डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली असून, त्यांच्या पायावर शस्त्रक्रिया करावी लागली आहे. गुंडप यांच्या पायाच्या उपचारावर आत्तापर्यंत 5 लाख रुपये खर्च झाला आहे आणि उपचाराचा हा खर्च आणखी वाढण्याची शक्यता आहे. डॉक्टरांनी त्यांना पूर्णपणे बेड रेस्ट घेण्यास सांगितले आहे. त्यांना कमीतकमी 10 महिने चालता येणार नाही. या कालावधीत ते कोणालाही प्रशिक्षण देऊ शकणार नाहीत, ज्यामुळे त्यांचे सामाजिक कार्य थांबले आहे. अपघात होऊन अनेक दिवस उलटूनही, डोंबिवलीतील टिळकनगर पोलीस या बेदरकार कारचालकाला पकडू शकलेले नाहीत. पोलिसांनी कारचा नंबर मिळाल्याचे सांगितले असले तरी, "कार चालक सापडत नाहीये," असे त्यांचे म्हणणे आहे, यावर आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

"रस्त्यावर अनेक मुले सरावासाठी जात असतात, त्यांचाही अशाच प्रकारे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, पोलिसांनी या बेदरकार कारचालकाला लवकरात लवकर अटक करावी आणि कठोर शिक्षा करावी, अशी मागणी गुंडप यांनी केली आहे.

## घणसोली विभागात अनधिकृत बांधकामावर कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (2) डॉ.राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घणसोली कार्यक्षेत्रातील श्री.कुशलचंद गौर (घरमालक), एन.जी. ग्रँड प्लाझा,रुम नं.502, प्लॉट नं.09, से.11 घणसोली, नवी मुंबई यांनी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता भोगवटा प्रमाणपत्रा व्यतिरिक्त सोसायटी अंतर्गत मोकळया स्पेसमध्ये विनापरवानगी अनधिकृतपणे वीट बांधकाम करुन पुढील बाजुस वाढीव बांधकाम करुन एक रुम तयार करुन दरवाजा काढला होता. संबधितांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,1966 चे कलम अन्वये संबधितांना नोटीस बजावण्यात आली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हुन हटविणे आवश्यक होते. परंतु सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदरच्या ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिका यांनी तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम 05 कामगार व 02 घन यांच्या सहाय्याने निष्कासीत करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी तसेच अतिक्रमण विभागातील अधिकारी / कर्मचारी, पोलिस पथक तैनात होते.

यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## नो पार्किंग मधील पोलिसांच्या दुचाकीवर वाहतूक पोलिसांचा कारवाईचा बडगा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** कल्याण स्टेशन परिसरात नो पार्किंग मध्ये पार्क केलेल्या दुचाकीवर गुरूवारी वाहतूक पोलिसांनी कारवाई चा बडगा उगरला. त्यामध्ये नो पार्किंग मध्ये पार्क केलेल्या पोलिसांच्या दुचाकी वर देखील कारवाईचा बडगा वाहतूक पोलिसांनी करीत कारवाई सर्वासाठी एकच असे चित्र यानिमित्ताने दिसले.

कोणत्याही कामाची सुरुवात आपल्या घरापासून करावी आणि याचे ज्वलंत उदाहरण कल्याणच्या वाहतूक विभागाने नुकत्याच केलेल्या कारवाईत पाहायला मिळाले.'पोलीस कर्मचाऱ्यांसाठी कोणतेही नियम नसतात का?' आणि 'नियम मोडणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई का केली जात नाही?' असे प्रश्न अनेकदा विचारले जातात. मात्र, आता कल्याणच्या वाहतूक विभागाने 'नो पार्किंग' क्षेत्रात उभ्या असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या वाहनांवर दंड आकारून शिस्तीच्या दिशेने एक आदर्श पाऊल उचलले आहे. कल्याण रेल्वे स्टेशन परिसरातील वाहतूक कोंडी हा नेहमीच त्रासदायक मुद्दा राहिला आहे. या भागात बिनधास्त रिक्षा, मोठी वाहने आणि अव्यवस्थितपणे पार्क केलेल्या दुचाकींमुळे वाहतूक ठप्प होते. परिस्थिती आणखी बिकट होते, जेव्हा पोलिसांच्या दुचाक्याही निष्काळजीपणे नो पार्किंगमध्ये उभ्या केल्या जातात. या समस्येची गंभीर दखल घेत वाहतूक विभागाने स्वतः पोलिसांच्या वाहनांवर कारवाई करत चालान केले आहे. स्टेशन परिसरात नो पार्किंगमध्ये उभ्या पोलिसांच्या वाहनांवर मोठ्या प्रमाणावर दंड आकारण्यात आला आहे.यापूर्वी अशी तक्रार होती की ट्रॅफिक पोलिस फक्त सामान्य नागरिकांवर कारवाई करतात, परंतु आता स्वतःच्या विभागावर शिस्त लावण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद मानला जात आहे. हा उपक्रम पुढेही सुरू राहील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या युवकावर ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी कुमार चंदन सिंग या युवकाविरुद्ध अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा 1989 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ९ ऑक्टोबर २०२५ रोजी उघडकीस आली.

चंदन सिंग यांनी व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवर एक व्हिडिओ पोस्ट केला होता. त्या व्हिडिओमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी अपमानास्पद विधानं करण्यात आली होती, जसे की – "बाबासाहेब ने संविधान नहीं लिखा, बी. एन. राव ने संविधान लिखा" तसेच "बाबासाहब अंग्रेजों का दलाल और एजेंट था". यासोबत चंदनने "इस बात से १००% सहमत हूँ" असे कॅप्शनही लिहिले होते. सदरची पोस्ट आयु. विकास गवई आणि आयु. मोहित लगाडे यांच्या निदर्शनास आली. त्यांनी चंदनशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी चंदनच्या बहिणीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण त्यातही यश आले नाही. विकास गवई स्वतः चंदन सिंगच्या राहत्या घरी गेले. त्यावेळी चंदन घरात स्वतःला कडी लावून बसला होता आणि बाहेर येण्यास नकार देत होता. त्यानंतर १०० नंबरवर संपर्क करून पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून चंदन सिंगला ताब्यात घेऊन चौकीत आणले.

या प्रकाराची माहिती तुर्भे विभागात पसरताच आंबेडकरी समाजामध्ये संतापाची लाट निर्माण झाली. मोठ्या संख्येने आंबेडकरी जनता तुर्भे MIDC पोलिस ठाण्यात जमा झाली. फिर्यादार म्हणून आयु. विकास गवई यांनी कुमार चंदन सिंगविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यान्वये गुन्हा दाखल केला.गुन्हा नोंदविताना ऍड. सिद्धार्थ हिरोडे (मुंबई उच्च न्यायालय), आयु. सुरुज वाकळे, सत्यशोधक मैत्री संघाचे अभ्यासक तसेच तुर्भे विभागातील महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. पुढील तपास तुर्भे MIDC पोलिस ठाण्यांतर्फे सुरू आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in






**मेष**
व्यवसायात लक्षणीय आर्थिक फायदा होईल आणि भविष्यात नवीन क्लायंट तुमच्यासोबत येतील, जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरतील.

**वृषभ**
कोणतेही नवीन काम सुरू करण्यापूर्वी, तुमच्या वडिलांचा सल्ला घ्या; यामुळे तुमची कामे योग्यरित्या पूर्ण होण्यास मदत होईल.

**मिथुन**
ऑफिसमध्ये सहकाऱ्यांना पाठिंबा द्याल आणि त्यांचे मनोबल वाढवाल, ज्यामुळे तुमच्या कामाची गुणवत्ता सुधारेल.राजकीय उपस्थिती वर्चस्व वाढेल.

**कर्क**
व्यवसायात दुप्पट आर्थिक नफा होईल, ज्यामुळे तो आणखी विस्तारण्यास प्रोत्साहन मिळेल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**सिंह**
जमीन आणि वाहनांशी संबंधित व्यावसायिक क्रियाकलापांमध्ये सुधारणा होईल.नोकरीत मोठे बदल करू शकता, जे फायदेशीर ठरतील.

**कन्या**
जवळच्या मित्राशी असलेले मतभेद सुधारतील, ज्यामुळे चांगले संबंध निर्माण होतील.कामाचे नियोजन केल्याने सकारात्मक परिणाम मिळतील.

**तूळ**
फिटनेससाठीही वेळ द्याल.सामाजिक कार्यात योगदान द्याल आणि कठोर परिश्रम आणि समर्पणाबद्दल संस्था सन्मान करतील.

**वृश्चिक**
स्वप्ने लवकर पूर्ण करू शकाल.एखाद्या मोठ्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळण्याची शक्यता आहे. कौटुंबिक संघर्षातून आराम मिळेल.

**धनु**
वैवाहिक जीवन आनंदी राहील आणि दोघांनाही वडिलांचे आशीर्वाद मिळतील. अनुभवी आणि जबाबदार व्यक्तींचे मार्गदर्शन आणखी बळकटी देईल.

**मकर**
आत्मविश्वास वाढेल. कौटुंबिक कार्यक्रमात सहभागी व्हाल, जवळच्या मित्रांना भेटाल. नवीन दृष्टिकोनाने सकारात्मक परिणाम मिळतील.

**कुंभ**
सरकारी नोकरीत काम करणाऱ्यांना आज बदलीची माहिती मिळू शकते. जोडीदाराचा आणि कुटुंबाचा पाठिंबा आत्मविश्वास आणखी मजबूत करेल.

**मीन**
तुमचे नाते अधिक सुसंवादी होईल. वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद आणि प्रेम तुमच्या घरात सकारात्मक ऊर्जा आणेल. आरोग्य चांगले राहील.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# पालघरमध्ये ठाकरे गटाला खिंडार

## गटनेता कैलास म्हात्रेसह चार नगरसेवक भाजपात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** - पालघर नगर परिषद क्षेत्रामध्ये गेल्या अनेक वर्षापासून ठाकरे गटासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावलेले माजी गटनेते कैलास म्हात्रे यांच्यासह चार नगरसेवकांनी शुक्रवारी भाजपचा रस्ता धरला आहे.

त्यामुळे आगामी नगरपरिषद निवडणुकांच्या काळात ठाकरे गटाला पालघर मध्ये मोठे भगदाड पडले आहे. कैलास म्हात्रे हे ठाकरे गटाचे एकनिष्ठ आणि खंबीर नेते होते. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून त्यांची होत असलेली घुटमळ आणि कुटंबना यामुळे त्यांनी भाजपची वाट धरल्याचे बोलले जाते.

त्यामुळे आगामी नगरपरिषद निवडणुकांच्या काळात ठाकरे गटाला पालघर मध्ये मोठे भगदाड पडले आहे. कैलास म्हात्रे हे ठाकरे गटाचे एकनिष्ठ आणि खंबीर नेते होते. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून त्यांची होत असलेली घुटमळ आणि कुटंबना यामुळे त्यांनी भाजपची वाट धरल्याचे बोलले जाते.

ठाकरे गटाच्या वरिष्ठ नेतृत्वाची समन्वयाची कमतरता या प्रवेशाला जबाबदार असल्याचेही चर्चा सध्या पालघर मध्ये आहेत. माजी गटनेते कैलास म्हात्रे यांच्यासह माजी नगरसेवक अक्षय संखे, दिनेश बाबर, हिंदवी पाटील, चेतना गायकवाड तसेच निलेश भोईर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला सध्या पालघर नगरपरिषदेमध्ये नगराध्यक्ष पदासाठी ओबीसीचे आरक्षण पडले आहे.

त्यामुळे कैलास म्हात्रे यांना नगराध्यक्ष पदासाठी भाजप उमेदवारी देणार असल्याची चर्चा राजकीय गोटात आहे. तर कैलास म्हात्रे यांना उमेदवारी मिळणार असल्याने भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

कैलास म्हात्रे यांना नव्याने सामावून घेतल्याने ते नगराध्यक्ष पदाचे दावेदार कसे बनतील, जुन्या जाणत्यांचे काय असा प्रश्न भाजपाच्या काही पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

# नैऋत्य मोसमी पावसाचा महाराष्ट्रातून काढता पाय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे / मुंबई**

नैऋत्य मोसमी पावसाने आता महाराष्ट्राला काढता पाय घेतला आहे. मुंबई, पुणे, मराठवाड्याला तुफान झोडपल्यानंतर पावसाने माघार घेण्यास सुरूवात केली आहे. मुंबईतून पावसाने माघार घेतल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. येत्या 3-4 दिवसांत संपूर्ण महाराष्ट्रातून पाऊस गाशा गुंडाळेल असेही हवामान खात्याने म्हटले आहे. यंदा दसऱ्यापर्यंत म्हणजेच 2 ऑक्टोबरपर्यंत महाराष्ट्राच्या अनेक भागात पाऊस पडत होता. 5 किंवा 6 ऑक्टोबरपासून पाऊस परतीच्या प्रवासाला लागेल असा अंदाज होता. पावसाचा माघारीचा प्रवास सुरू झाल्याने गेल्या काही दिवसांत आकाश निरभ्र झाले होते. हवेतील उकाडा वाढल्याचेही जाणवू लागले होते. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पावसाच्या परतीच्या प्रवासाचा मागोवा घेणारी रेषा अलिबाग, अहिल्यानगर आणि अकोल्यातून जाताना दिसत होती. या रेषेखालील भागातून पाऊस पूर्णपणे संपला असून उर्वरीत भागातून लवकरच पाऊस काढता पाय घेईल असा याचा अर्थ आहे.

### ■ यंदा थंडीचा कडाका अधिक ?

पाऊस थांबल्यानंतर वातावरण लगेच बदलले आहे. दिवसा उकाडा आणि संध्याकाळनंतर हवेत गारवा जाणवू लागला आहे. थंडीची चाहूल लागली असून यंदा कडाक्याची थंडी पडेल अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत सकाळच्या वेळी आणि संध्याकाळनंतर वातावरणात गारवा , दिवसाचे तापमान 30 ते 32 अंश सेल्सिअसच्या आसपास राहील, पण रात्री तापमानात घट झालेली दिसेल, यामुळे आता छत्र्या, रेनकोट गुंडाळून ठेवण्याची वेळ आली असून स्वेटर, शाली, मफलर, कानटोप्या बाहेर काढण्याची वेळ आली आहे.

# आज कर्जत स्थानकात ब्लॉक

## डेक्कन क्वीनसह मुंबई- पुणे मार्गावरील 5 गाड्या रद्द

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई- पुणे मार्गावर रेल्वे प्रवास करणाऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. कर्जत यार्ड पुनर्डभारणी आणि आधुनिक सिग्नलिंग प्रणालीच्या नॉन-इंटरलॉकिंग कामांसाठी मध्य रेल्वेने पळसदरी ते भिवपुरी विभागात १९ तासांचा ब्लॉक जाहीर केला आहे. हा ब्लॉक शनिवारी दुपारी १२.२० ते रविवारी पहाटे ७.२० पर्यंत लागू राहणार असल्याने पुणे-मुंबई मार्गावर प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. या ब्लॉकमुळे अनेक प्रमुख एक्स्प्रेस गाड्या रद्द होणार असून, इतर काही गाड्या पुणेपर्यंतच मर्यादित राहणार आहेत.

**■ 19 तासांचा मेगाब्लॉक**

तसेच, पर्यायी मार्गाने वळवल्या जाणाऱ्या गाड्यांमुळे प्रवास वेळेत उशीर होण्याची शक्यता आहे. याशिवाय, उद्या (शनिवार) पाच लोकल ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत.मध्य रेल्वेच्या अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्जत यार्डाचे पुनर्डभारण आणि सिग्नलिंग प्रणालीचे आधुनिकीकरण हे रेल्वे वाहतुकीला अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम बनवण्यासाठी आवश्यक आहे. या कामांमुळे पळसदरी ते भिवपुरी या विभागातील ट्रॅक आणि सिग्नलिंग सिस्टीम पूर्णपणे बंद राहणार आहे. हा ब्लॉक एकूण १९ तासांचा असून, तो शनिवारी दुपारी १२.२० वाजता सुरू होईल आणि रविवारी सकाळी ७.२० पर्यंत चालू राहील. या कालावधीत या विभागात कोणत्याही गाडीचा प्रवास शक्य नसल्याने रेल्वेने प्रवाशांसाठी पूर्वसूचना जारी केली आहे.रद्द होणाऱ्या प्रमुख एक्स्प्रेस गाड्याया ब्लॉकचा सर्वाधिक परिणाम पुणे-मुंबई मार्गावरील एक्स्प्रेस गाड्यांवर होणार आहे.



# मासेमारीच्या नव्या हंगामाला अतिवृष्टीचा फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (प्रतिनिधी)**

यंदा पावसाळी मासेमारीबंदी संपुष्टात आल्यानंतर १ ऑगस्टपासून सुरू झालेल्या मासेमारीच्या नव्या हंगामाला अतिवृष्टी, वादळी वारे यांचा मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. हंगामाच्या सुरुवातीलाच पारंपरिक मच्छिमारांना अनपेक्षित नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागल्याने ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक असूनही खराब हवामानामुळे या दोन महिन्यांत मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही. यामुळे, ठाणे, नवी मुंबईसह रायगड जिल्ह्यातील कोळी बांधवांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

यावर्षी, नारळी पौर्णिमेनंतर अचानक वादळी हवामान आणि अतिवृष्टी सुरू झाली. त्यामुळे मासेमारीत काही दिवसांचा खोळंबा झाला. त्यानंतर मासेमारी सुरू झाली. पुन्हा गौरी-गणपतीच्या काळात खराब हवामानामुळे मासेमारी खोळंबली. नवरात्रोत्सव सुरू होताच पुन्हा बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने अतिवृष्टी व वादळी हवामानामुळे मासेमारी खोळंबली. यामुळे, नवी मुंबईतील स्थानिक कोळी बांधवांना याचा फटका बसला आहे. मत्स्य व्यवसायचा शेतीचा दर्जा मिळाला असल्याने अतिवृष्टी, लहरी हवामानामुळे घरी बसावे लागलेल्या मच्छीमारांना शासनाने आर्थिक नुकसान भरपाई देण्याची मागणी सिडकोचे माजी संचालक नामदेव भगत यांनी केली आहे. ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक महिने असूनही खराब हवामान, वादळ आणि अतिवृष्टी यामुळे या दोन महिन्यांत पारंपरिक मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही. आगरी-कोळी समाजातील मच्छिमारांना मासेमारी करण्यास न जमल्याने मोठा आर्थिक फटका बसला असल्याचे नामदेव भगत यांनी यावेळी सांगितले.

# डोंबिवलीत सुरक्षा रक्षकाची लहान मुलांना दोरीने बांधून मारहाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली - शिळफाटा रस्त्यावरील खोणी पलावा, कासा बेला पलावा भागात दररोज विविध प्रकारचे गुन्हे घडत असताना, बुधवारी दोन लहान मुले पलावा कासा बेला गोल्डमधील क्रेस्टा सोसायटी आवारात व्हॉलीबॉल खेळत होती. खेळताना व्हॉलीबॉल बाजुच्या सोसायटी आवारात उडाला. ही मुले व्हॉलीबॉल आणण्यासाठी गेली तेव्हा तेथील सुरक्षा रक्षक राजेंद्र खंदारे यांनी दोन्ही लहान मुलांना दटावले. त्यांचे हात रूमालाने बांधून त्यांना मारहाण केली. याप्रकरणी या मुलांच्या पालकांच्या तक्रारीवरून मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.**

पाऊस कमी झाल्याने आता लहान मुले संध्याकाळच्या वेळेत सोसायटी आवारात, सार्वजनिक रस्त्यावर, मोकळ्या मैदानांमध्ये खेळताना दिसत आहेत. बुधवारी संध्याकाळी कल्याण शिळफाटा रस्त्यावरील पलावा वसाहतीमधील कासा बेला गोल्ड भागातील क्रेस्टा इमारतीच्या आवारातील उद्यानात लहान मुले व्हॉलीबॉल खेळत होती. खेळत असताना एका मुलाने मारलेल्या जोरदार बुक्क्याने व्हॉलीबॉल बाजुच्या इमारतीच्या आवारात उडाला.

हा उडालेला व्हॉलीबॉल सुरक्षा रक्षकाने चुकून आल्याने मुलांना परत करणे अपेक्षित होते. याउलट दुसऱ्या इमारतीचा सुरक्षा रक्षक राजेंद्र खंदारे यांनी सोसायटीच्या आवारात आलेल्या दोन लहान मुलांना तुम्ही बॉल आमच्या सोसायटीच्या आवारात का उडवला. तुमच्या बॉलमुळे आमच्या सोसायटी आवारातील वाहनांचे नुकसान झाले आहे. सदस्य मला याप्रकरणी ओरडा करतील. परत असा प्रकार होता कामा नये, असे

### मानपाडा पोलिसात गुन्हा दाखल

बोलत सुरक्षा खंदारे याने पहिले एका मुलाला जवळ घेतले आणि त्याला परत असा बॉल परत आला तर तुम्हाला त्या ठिकाणी बांधून ठेवीन अशी दटावणी केली. त्यानंतर दुसऱ्या मुलाला सुरक्षा रक्षक खंदारे यांनी जवळ घेतले. दोघांचे हात रुमालाने बांधले. आणि त्यांना दटावणीच्या स्वरात मारहाण करत पुन्हा बॉल आमच्या सोसायटीच्या आवारात येणार नाही ना, असे प्रश्न केले.

या मुलांनीही सुरक्षा रक्षकाने आम्हाला मारहाण केल्याचा दावा केला आहे. मुलांनी सुरक्षा रक्षकाच्या तावडीतून सुटका करून घेतली. आणि ती घरी आली, त्यांनी घडला प्रकार आपल्या आई वडिलांना सांगितला. या दोन्ही मुलांचे पालक तात्काळ बाजुच्या सोसायटीच्या आवारात गेले. तेथे सुरक्षा राजेंद्र खंदारे यांना, मुलांकडून चुकून बॉल उडून आला म्हणून तुम्ही मुलांचे हात का बांधले आणि त्यांना का मारहाण केली असे प्रश्न केले.

यावेळी सामंजस्याची भूमिका घेण्याऐवजी खंदारे यांनी पालकांसोबत अरेरावीची भाषा केली. मी कोणाला घाबरत नाही. तुम्ही काहीही करा. मला काहीही होणार नाही, अशी त्याची उर्मट भाषा होती. सुरक्षा रक्षक खंदारे ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने ही माहिती सोसायटी अध्यक्ष योगेश पाटील यांना देण्यात आली.

अखेर सोसायटीने याप्रकरणी सुरक्षा रक्षक खंदारे यांच्या विरूध्द मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला. अध्यक्ष पाटील यांनी या प्रकरणाची माहिती मानपाडा पोलिसांना दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच मानपाडा पोलिसांनी राजेंद्र खंदारे यांना अधिकच्या चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यांना नोटिस देण्यात आली आहे, अशी माहिती साहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी दिली.

# मनपाच्या दुर्लक्षामुळे वसईतील रस्ते खड्ड्यात !

## नोव्हेंबर अखेर पूर्ण होणार दुरुस्ती - पालिकेचा दावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई: ऑक्टोबर महिना सुरु झाला असला तरीही शहरातील रस्ते दुरुस्तीची कामे अजूनही पूर्ण झाली नाहीत. तर दुसरीकडे कामांसाठी पुन्हा एकदा कोट्यावधी रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्षात रस्ते दुरुस्तीची कामे नोव्हेंबर अखेर पर्यंत पूर्ण केली जाणार आहेत असा दावा पालिकेकडून करण्यात येत आहे.**

वसई विरार शहरात यंदा झालेल्या पावसामुळे विविध ठिकाणच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खड्डयांचा त्रास वाहनचालकांसह नागरिकांना सहन करावा लागत आहे. या खड्डयांमुळे अपघाताच्या घटना ही समोर येऊ लागल्या आहेत.

तर दुसरीकडे रिक्षाचालक व दुचाकी स्वार यांना या खड्डयांमुळे आरोग्य विषयक समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. गणेशोस्तव आणि नवरात्रोत्सवाच्या दरम्यान तरी रस्त्यांची दुरुस्ती होईल अशी आशा नागरिकांना होती. मात्र दोन्ही सण संपले असून दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असला तरी सुद्धा रस्त्यांची दुरुस्ती झाली नसल्याचे चित्र दिसून येत आहे. पालिकेच्या दुर्लक्षितपणामुळे ही समस्या कायम असल्याचा आरोप नागरिकांमधून करण्यात येत आहे.

नुकताच पालिकेने शहरातील खड्डे दुरुस्ती व प्रमुख रस्त्यांचे नूतनीकरण यासाठी निविदा काढल्या आहेत. यात आठ प्रमुख रस्त्यांचे डांबरीकरण व खडीकरण यासाठी ५५ कोटी ७९ लाख तर इतर शहरांतर्गत रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ६८ कोटी २७ लाखांचा निधी खर्च केला जाणार आहे.

मात्र ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी व प्रत्यक्षात काम पूर्ण होण्यासाठी काही कालावधी जाणार आहे. रस्ते दुरुस्तीची कामे पुढील आठवड्यात सुरू करून नोव्हेंबर अखेर पर्यंत पूर्ण केली जातील असा दावा महापालिकेने केला आहे.

# बीएसयूपी योजनेतील २९७ लाभार्थ्यांना दिवाळीत मिळणार घरकुल?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर** : मिरा-भाईंदर महापालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या बीएसयुपी योजनेंतर्गत स्थलांतर करण्यात आलेल्या एकूण 2 हजार 136 लाभार्थ्यांपैकी केवळ 473 लाभार्थ्यांनाच पुनर्वसन करण्यात आले आहे. तर उर्वरीत 1 हजार 663 लाभार्थी पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. यातील 297 लाभार्थ्यांना येत्या दिवाळीत घरकुल देण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. गेल्या 2013 पासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या 1 हजार 663 लाभार्थ्यांपैकी 297 लाभार्थ्यांचे यंदाच्या दिवाळीत पुनर्वसन केले जाणार असल्याचे बोलले जात असले तरी त्याला पालिकेचा दुजोरा मिळालेला नाही. तरीही पालिकेने या लाभार्थ्यांचे पुनर्वसन केल्यास त्यांच्यासाठी यंदाची दिवाळी अत्यंत महत्वाची ठरणार आहे. केंद्राच्या गृहनिर्माण व शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालयाने 13 फेब्रुवारी 2008 रोजी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरातील गरीबांना पायाभूत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने बीएसयुपी योजना राबविण्यास मान्यता दिली.

यानंतर मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील जनता नगर व काशीचर्च येथील झोपडीधारकांना बीएसयूपी योजनेंतर्गत पक्की घरे बांधून देण्याच्या योजनेला 2009 मधील महासभेने मान्यता दिली. या योजनेची परिपुर्ण माहिती तेथील झोपडीधारकांना न दिल्याने त्यांच्यात संभ्रम निर्माण झाला. परिणामी त्यांनी योजनेला तीव्र विरोध करण्यास सुरुवात केली. त्यामुळे योजनेच्या कामाला विलंब होऊन ती प्रत्यक्षात 2013 मध्ये राबविण्यास सुरुवात झाली. या योजनेत एकूण 4 हजार 136 झोपडीधारकांना सामावून घेण्यात आले आहे. त्यासाठी आठ मजल्यांच्या 3 तर 16 मजल्यांच्या 6 इमारती बांधण्याचे निश्चित करण्यात आले.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासन सतर्क

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : सणासुदीच्या काळात मिठाई, फराळ आणि गोड पदार्थांची मागणी वाढते. मात्र, या काळात दुग्धजन्य पदार्थात भेसळ होण्याची शक्यता जास्त असल्याने अन्न व औषध प्रशासन (एफडीए) ने सणासुदीसाठी विशेष तपासणी मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. या मोहिमेचा उद्देश नागरिकांना चांगल्या प्रतिची मिठाई व फराळ उपलब्ध होणे हा आहे. मात्र, ग्राहकांनीही मिठाई खरेदी करताना सजग राहण्याचे आवाहन एफडीए प्रशासनाने केले आहे. याशिवाय, मिठाईची मुदत संपण्याची ही तारीख त्यावर लिहावी असे आवाहन करण्यात आले आहे.



मिठाई व गोड पदार्थ नाशवंत असतात, त्यामुळे त्यांचे उत्पादन, साठवणूक, मुदतबाह्य तारीख आणि कच्च्या मालाची माहिती दिली जाणे आवश्यक आहे. एफडीएने यावर विशेष लक्ष देत तळण्यासाठी एकाच तेलाचा वापर, कृत्रिम रंग निर्धारित मात्रेपेक्षा जास्त न वापरणे आणि स्वच्छतेच्या निकषांचे पालन झाले आहे का, याची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

मिठाई व गोड पदार्थ नाशवंत असतात, त्यामुळे त्यांचे उत्पादन, साठवणूक, मुदतबाह्य तारीख आणि कच्च्या मालाची माहिती दिली जाणे आवश्यक आहे. एफडीएने यावर विशेष लक्ष देत तळण्यासाठी एकाच तेलाचा वापर, कृत्रिम रंग निर्धारित मात्रेपेक्षा जास्त न वापरणे आणि स्वच्छतेच्या निकषांचे पालन झाले आहे का, याची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

२५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा" या नावाने विशेष तपासणी मोहीम राबविणार आहे. या मोहिमेत राज्यात नमुने गोळा कारण्यासोबत नागरिकांना प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतून मार्गदर्शन करण्याचे प्रयत्न होणार आहेत.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांवर देखील लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. दुधामधून भेसळ रोखणे, पनीरसदृश्य अनालॉग वापर टाळणे आणि गुणवत्तेची नियमित तपासणी करणे या उपाययोजनांमध्ये समावेश आहे. या माध्यमातून कोलेस्ट्रॉल वाढणे, वजन वाढणे आणि आरोग्याशी संबंधित समस्या होऊ नयेत, असा प्रयत्न आहे. मोहीम दरम्यान नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी टोल-फ्री क्रमांक १८००-२२२-३६५ वर कळवता येतील.

# शंकर पाटोळे यांचा जामीन अर्ज फेटाळला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिकेतील निलंबित उपायुक्त शंकर पाटोळे यांचा जामीन अर्ज ठाणे न्यायालयाने शुक्रवारी फेटाळला. पाटोळे यांच्यासह तिघांना २५ लाख रुपये घेताना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती. ठाणे जिल्हा सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.एस. शिंदे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्यावरही प्रश्नांची सरबत्ती केली. दोन तास युक्तीवाद झाल्यानंतर तिघांचेही जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळले.

जागेवरील अतिक्रमण हटविण्यासाठी मुंबईतील एका बांधकाम व्यवसायिकाकडून त्यांनी ५० लाख रुपयांची लाच मागितल्याचे ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाचे उपायुक्त शंकर पाटोळे यांना मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती. याप्रकरणात पाटोळे यांच्यासह तिघांना अटक झाली होती.

पाटोळे यांच्यावरील कारवाईनंतर महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाटोळे यांना सेवेतूनही निलंबित केले होते. शुक्रवारी ठाणे जिल्हा सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.एस. शिंदे यांच्या न्यायालयात युक्तीवाद झाला. याप्रकरणाचा तपास सुरु असल्याने पुराव्यांमध्ये छेडछाड होऊ नये यासाठी जामीन फेटाळल्याचे न्यायालयाने म्हटले.



ठाणे ◆ शनिवार
११ ऑक्टोबर २०२५
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पान ४

## आर्थिक शिस्तीला नवे बळ : भिवंडी महानगरपालिका करणार क्रेडीट रेंटीगची अंमलबजावणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से.) यांच्या पुढाकाराने महानगरपालिकेचे पत मानांकनाचे (क्रेडीट रेटींग) काम हाती घेण्यात आले आहे. सदर पत मानांकनाचे काम SEBI मार्फत मान्यता प्राप्त असलेली CRISIL RATINGS या नामांकीत संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.पत मानांकन करण्यापुर्वी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा सखोल अभ्यास करुन त्याचे विश्लेषण केल्यानंतर CRISIL RATINGS ही संस्था महानगरपालिकेचे पत मानांकन निश्चित करणार आहे. या पत मानांकनामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थितीबाबतची श्वेतपत्रिका तयार होऊन महानगरपालिकेच्या आर्थिक क्षमतेबाबत सुस्पष्टता निर्माण होणार आहे. याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे केंद्र/राज्य शासनाच्या अर्बन चॅलेंज फंड अंतर्गत पायाभूत सुविधा राबविण्याकरिता निधीची मागणी करता येणार आहे. तसेच महानगरपालिकेस प्रसंगी भांडवल उभारणीकरिता कर्ज रोखे काढण्यास मदत होणार आहे. सद्य:स्थितीत राबविण्यात येणाऱ्या योजनांची फलनिष्पत्ती कळणार असून, महानगरपालिकेच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजाचे विश्लेषण करण्यात येणार आहे. SEBI मान्यता प्राप्त CRISIL RATINGS या संस्थेने आतापर्यंत देशातील विविध शासकीय संस्था, महानगरपालिका तसेच सार्वजनिक उपक्रमांचे यशस्वीरित्या पतमानांकन केले आहे.

# भारत-ब्रिटन संबंधांसाठी 'ब्रिस्क' (BRISK) युगाची सुरुवात

मुंबई शहरात उत्साहाचे वातावरण आहे, कारण युनायटेड किंगडमचे (UK) प्रधानमंत्री केअर स्टारमर यांच्या दुसऱ्या दिवसाच्या दौऱ्यामुळे सर्वांचे लक्ष या शहराकडे लागून राहिले आहे. 'ग्लोबल फिनटेक फेस्ट'च्या भव्य समारोपाकडे सगळयांच्या नजरा खिळल्या आहेत. भारत आणि यूके यांच्यातील वाढत्या मैत्रीचे हे जोरदार प्रदर्शन आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि प्रधानमंत्री स्टारमर आज एकत्र मुख्य भाषण देणार आहेत. ही भेट केवळ एक औपचारिक राजनयिक शिष्टाचार नाही, तर शतकानुशतके चाललेल्या सहकार्याच्या विकासाचा आणि दोन्ही देशांमधील जुन्या नात्यातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा कळस आहे.

### ऐतिहासिक वळण: 'कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप' (Comprehensive Strategic Partnership)

२०२५ हे वर्ष भारत आणि यूकेच्या संबंधांसाठी एक निर्णायक वळण ठरले आहे. अनेक शतकांचा इतिहास असलेल्या या संबंधाला आता औपचारिक 'कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप'चे रूप मिळाले आहे. 'भारत-यूके व्हिजन २०३५' या भागीदारीला मार्गदर्शन करत आहे, ज्यात दोन्ही देशांसाठी समान विकास आणि समृद्धीची योजना आहे. दोन्ही राष्ट्रांमध्ये भक्कम राजकीय इच्छाशक्ती असल्याने हे संबंध अधिक दृढ झाले आहेत. यावर्षी जुलैमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनी यूकेचा दौरा केला, त्यानंतर प्रधानमंत्री स्टारमर यांचा भारत दौरा या भागीदारीला नवी गती देत आहे. हा दौरा दोन्ही देशांतील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण आणि मूर्त फायदे देण्याचे वचन देतो. उद्याचे (आजचे) भाषण, ज्यात १,००,००० हून अधिक जागतिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मंचावर या भागीदारीची अविश्वसनीय क्षमता दर्शवणारा एक निर्णायक क्षण ठरेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसाठी, ज्यांच्या राजनयिक प्रवासात जगभरातील धोरणात्मक भागीदारांशी संबंध अधिक घट्ट करण्याचा समावेश आहे, हा क्षण भारताच्या जागतिक महासत्ता म्हणून उदयास येण्याचे प्रतीक आहे. देशांतर्गत आर्थिक सुधारणांना पाठिंबा देण्यापासून ते जागतिक लोकशाही भागीदारांशी जोडणी साधण्यापर्यंत, प्रधानमंत्री मोदी यांच्या प्रयत्नांमुळे यूकेसोबतच्या या नूतनीकृत अध्यायाचा पाया रचला गेला आहे. यूके, ज्याचा भारताशी ऐतिहासिक आणि बहुआयामी संबंध आहे, आता समान भागीदार म्हणून पुढे आले आहे.

### आर्थिक वाढ आणि संधींसाठी इंजिन

मुंबईतील या बहुप्रतिक्षित घोषणांचा आधार याच वर्षाच्या सुरुवातीला, २४ जुलै २०२५ रोजी, स्वाक्षरी झालेला 'व्यापक आर्थिक आणि व्यापार करार' (CETA - Comprehensive Economic and Trade Agreement) आहे. अनेक वर्षांच्या तीव्र वाटाघाटीनंतर हा महत्त्वपूर्ण करार व्यापार क्षेत्राचे स्वरूप बदलणार आहे. भारतीय ग्राहक, उत्पादक आणि निर्यातदारांसाठी हा करार नवीन संधींचे दरवाजे उघडेल, ज्यामुळे अनेक उद्योग आणि लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील.

या करारामुळे यूकेच्या बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील सीमाशुल्क (Tariffs) संपुष्टात येईल. यात पारंपरिक भारतीय वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू, कृषी उत्पादने आणि ऑटोमोटिव्ह घटकांचा समावेश आहे. केवळ आकडेवारीच्या पलीकडे, या कराराचा उद्देश रोजगार निर्मिती करणे, नावीन्यपूर्णतेला (Innovation) प्रोत्साहन देणे आणि सर्व क्षेत्रांमध्ये समृद्धी वाढवणे आहे.

हा करार महत्त्वपूर्ण आकडेवारी दर्शवतो. द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ४३ अब्ज पौंडांवरून वर्षाला २५.५ अब्ज पौंडांनी वाढण्याचा अंदाज आहे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, या करारामुळे कालांतराने भारताच्या वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) ५.१ अब्ज पौंडांची भर पडू शकते. या आकडेवारीमागे कारागिरांपासून ते तंत्रज्ञान स्टार्टअप्सपर्यंत, जागतिक बाजारपेठांमध्ये पोहोचण्याची कोट्यवधी भारतीयांची स्वप्ने दडलेली आहेत.

हा करार ४८ तासांच्या आत मालाच्या मंजुरीसाठी सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करण्याचे वचन देतो, ज्यामुळे लहान आणि मध्यम उद्योगांना (SME's) सामोरे जाव्या लागणाऱ्या लाल फितीच्या (Red Tape) अडचणी कमी होतील. हे प्रधानमंत्री मोदी यांच्या 'व्यवसाय सुलभतेचे' (Ease of Doing Business) भारताला जगातील शीर्ष जागतिक व्यापार आणि गुंतवणूक केंद्र बनवण्याच्या दीर्घकाळच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते.

प्रधानमंत्री मोदी यांच्या धोरणात्मक भाषणांमध्ये अनेकदा उद्धृत केले जाणारे 'व्यवसाय सुलभतेचे' हे सूत्र या करारामुळे नव्याने महत्त्वाचे ठरते, कारण हा करार केवळ मोठ्या उद्योगांनाच नव्हे, तर विशेषतः भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या लहान आणि मध्यम उद्योगांनाही आधार देतो.या कराराला यूकेमध्ये द्विपक्षीय पाठिंबा असल्याने राजकीय स्थैर्य सुनिश्चित होते, ज्यामुळे निवडणुकीच्या पलीकडेही या भागीदारीचे दीर्घायुष्य स्पष्ट होते. यूके ब्रेक्झिटनंतरच्या जागतिक दृष्टिकोनात भारताला किती महत्त्व देते, हे यातून दिसून येते.



### हिंद-प्रशांतमध्ये (Indo-Pacific) सुरक्षा बंधन मजबूत करणे

ही भागीदारी केवळ अर्थव्यवस्थेपुरती मर्यादित नसून, संरक्षण आणि सुरक्षेच्या क्षेत्रातही पोहोचली आहे – जे 'व्हिजन २०३५'च्या रोडमॅपचा आधारस्तंभ आहे. हिंद-प्रशांत (Indo-Pacific) धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनत असताना, दोन्ही देशांनी मुक्त, खुले आणि स्थिर प्रदेशासाठी एक समान दृष्टिकोन जपला आहे.

अलीकडील नौदल सराव 'कोंकण २०२५'मध्ये हे चित्र स्पष्टपणे दिसले, जिथे भारताची आयएनएस विक्रांत आणि यूकेची एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स समन्वय साधून कार्यरत होती. ही कार्यात्मक समन्वयता दोन्ही सशस्त्र दलांमध्ये वाढती आंतरकार्यक्षमता (Interoperability) आणि प्रादेशिक शांततेसाठी त्यांची दृढ वचनबद्धता दर्शवते.

भारतीय वायुसेनेसोबतच्या हवाई संरक्षण सरावाने (Aerial Defence Exercise) या सहकार्याला पूरक बनवले आहे. ही त्रि-सेवा समन्वयता (Tri-service coordination) या भागीदारीच्या खोलीचे दुर्मिळ उदाहरण आहे.

याव्यतिरिक्त, जुलै २०२५ चा 'संरक्षण औद्योगिक रोडमॅप' (Defence Industrial Roadmap) खरेदीदार-विक्रेता गतिशीलता बदलून सह-विकास (Co-development) आणि संयुक्त उत्पादनाकडे एक मूलभूत बदल दर्शवतो. प्रधानमंत्री मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेशी जुळलेला हा रोडमॅप तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त संशोधन आणि भारताची देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो. यातून भारताला जागतिक संरक्षण नवोपक्रम (Innovation) आणि धोरणात्मक स्वायत्ततेत अग्रेसर भूमिका घेता येईल, तसेच मोठ्या प्रमाणात उच्च-कुशल रोजगार निर्माण होतील.

### 'लिव्हिंग ब्रिज': चिरस्थायी लोक-ते-लोक जोडणी

धोरणात्मक करारांपलीकडे, 'लोक-ते-लोक जोडणीचा चिरस्थायी 'लिव्हिंग ब्रिज' या भागीदारीचे हृदय आहे. यूकेमधील भारतीय डायस्पोरा (Diaspora - स्थलांतरित भारतीय समुदाय), जो तेथील लोकसंख्येच्या २.६ टक्के आहे आणि ६५,००० हून अधिक व्यवसायांचे मालक आहेत, हे अमूल्य सामाजिक-आर्थिक बंधन दृढ करतात.

**ब्रिजेश सिंह (भा.पो.से.),**
**प्रधान सचिव तथा महासंचालक**
**(माहिती व जनसंपर्क).**

२०२५ मध्ये पुन्हा पुष्टी झालेली उच्च शिक्षण पात्रतेची परस्पर मान्यता भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसमोरील अडथळे दूर करते, प्रतिभा गतिशीलता (Talent Mobility) आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढवते. जागतिकीकरणाच्या जगात जिथे कौशल्ये आणि ज्ञान सीमा ओलांडतात, तिथे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

'व्हिजन २०३५'च्या शैक्षणिक विस्ताराचे उदाहरण युनिव्हर्सिटी ऑफ साउथम्प्टनच्या गुरुग्राम कॅम्पसच्या जून २०२५ मधील उद्घाटनातून दिसते. हा उपक्रम जागतिक प्रतिभेचे संगोपन करतो आणि दूरदृष्टीच्या शैक्षणिक सहकार्याचे प्रतीक आहे.

याला पूरक म्हणून, भारत-यूके 'ग्रीन स्किल्स' भागीदारी नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत शेती आणि पर्यावरणीय लवचिकतेमध्ये (Environmental Resilience) तरुणांची क्षमता विकसित करते - ज्यामुळे भविष्यातील जागतिक आव्हानांसाठी तयारी सुनिश्चित होते.

### तंत्रज्ञान, नावीन्य आणि मुंबईच्या फिनटेक फेस्टमधील सामायिक भविष्य

या भागीदारीचे भविष्यवेधी लक्ष तंत्रज्ञान आणि नावीन्य आहे, जे ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. १०० हून अधिक देशांतील ८०० हून अधिक स्पीकर्ससह, हा उत्सव प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर यांच्या दृष्टिकोनासाठी एक आदर्श मंच प्रदान करतो.

डिजिटल पेमेंट आणि आर्थिक समावेशनात (Financial Inclusion) भारताची अग्रणी भूमिका यूकेच्या जागतिक वित्तीय परिसंस्थेचे (Global Financial Ecosystem) पूरक आहे, ज्यामुळे अधिक गहन तांत्रिक सहकार्याचा मार्ग मोकळा होतो.

'तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमा' (Technology Security Initiative) द्वारे, दोन्ही देश दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मध्ये संयुक्त उपक्रम आणि सेमीकंडक्टर आणि खनिजांसाठी महत्त्वपूर्ण पुरवठा साखळी सुरक्षित करण्यावर भर देतात. लवचिक, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली तयार करणे आता राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक वाढ जपण्यासाठी केंद्रस्थानी आहे. हवामान कृती (Climate Action) हा एक मुख्य आधारस्तंभ राहिला आहे. दोन्ही देश स्वच्छ ऊर्जा स्वीकार आणि ग्रीन फायनान्स बाजारपेठांना कुशल बनवण्यास गती देतात. बीपी (BP) आणि शेल (Shell) यांसारख्या यूकेच्या कंपन्यांची भारतातील स्वच्छ इंधन आणि इलेक्ट्रिक वाहन पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक या उद्दिष्टांच्या दिशेने उचललेली व्यावहारिक पाऊले दर्शवते.

हवामान आणि नावीन्य यावरील आपल्या अनेक भाषणांमध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी असा दृष्टिकोन मांडला आहे जिथे आर्थिक वाढ आणि शाश्वतता (Sustainability) हातात हात घालून चालतात. ही द्विपक्षीय भागीदारी त्या दृष्टिकोनाला प्रतिबिंबित करते, ज्यामुळे ती जागतिक सहकार्यासाठी एक दीपस्तंभ ठरते.

### नव्या युगाची सुरुवात

प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर आज आपले मुख्य भाषण देण्यासाठी सज्ज असताना, त्यांचा संयुक्त संदेश सामायिक मूल्ये आणि परस्पर लाभावर आधारित एका परिपक्व भागीदारीचे प्रतीक असेल. ही युती त्यांची एकत्रित आर्थिक ताकद, सुरक्षा सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि नावीन्यपूर्ण भावना यांचा फायदा घेते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अटळ धोरणात्मक दृष्टिकोनाच्या मार्गदर्शनाखाली, ही भागीदारी केवळ पुनरुज्जीवित झालेली नाही—तर एका नवीन युगासाठी तिची पुनर्कल्पना केली गेली आहे. एकत्र येऊन, भारत आणि युनायटेड किंगडम समृद्धी देण्यासाठी, सुरक्षा वाढवण्यासाठी आणि स्थिर आणि मुक्त जागतिक व्यवस्थेचे (Global Order) आधारस्तंभ टिकवून ठेवण्यासाठी सज्ज आहेत. त्यांची नूतनीकृत युती केवळ त्यांच्या लोकांचे भविष्यच नव्हे, तर आगामी दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांचा मार्गही निश्चित करण्याचे वचन देते.

---

## डॉ. आनंदराव सूर्यवंशी यांना शिक्षण महर्षी पुरस्कार

### वयाची ७५ वर्षे पूर्ण झालेल्या व विवाह बंधनाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठांचा सन्मान सोहळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** ज्येष्ठ नागरिक संघ सुभाष मैदान ह्या संघाने आता ४९ व्या वर्षात पदार्पण केले आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षात लवकरच हा संघ पदार्पण करणार आहे . सदर संघाचा ज्येष्ठ नागरिक दिन सोहळा दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी संघाच्या सभागृहात संपन्न झाला . वयाची पंच्याहत्तरी पूर्ण करणाऱ्या आणि वैवाहिक जीवनाची ५० वर्षे पूर्ण करणाऱ्या ज्येष्ठांचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला . या शुभ प्रसंगी ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती कल्याणचे अध्यक्ष श्री . यशवंत कोसुळकर आणि सुभाष मैदान ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा सौ . सुनिता मोराणकर व मान्यवर यांनी दीपप्रज्वलन केले. सौ . दिपाली दळवी यांनी ईश स्तवन केले. मान्यवरांचे स्वागत




**साप्ताहिक कल्याण नागरिक चे संपादक श्री. कांबळे यांनी निवृत्त उप शिक्षण अधिकारी , मुंबई मनपा डॉ. आनंदराव सूर्यवंशी यांचा शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल 'शिक्षण महर्षी पुरस्कार २०२५ ' सन्मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरव केला . संघाचे सदस्य डॉ. सूर्यवंशी आणि श्रीमती भावना प्रधान यांनी या देखण्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले . संघाचे सहकार्यवाह श्री. अरविंद शिंपी यांनी आभार प्रदर्शन केले. संघाच्या कार्यवाह सौ मिनल ठाकोर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.**

करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष यशवंत कोसुळकर यांनी प्रास्ताविक केले . नंतर संघाच्या अध्यक्ष सौ . मोराणकर यांनी मनोगत व्यक्त केले .३५ सभासदांचा बुके , शाल व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला . वयाची ८० वर्षे पूर्ण केलेल्या व त्याहून अधिक वय असलेल्या सभासदांचा ही सत्कार करण्यात आला . जीवनातील भावपूर्ण प्रसंग त्यांनी कथन केले . ज्येष्ठांना सामाजिक जीवनात आलेल्या अनुभवांची मालिका सादर केली . सार्वजनिक वाचनालय कल्याणचे सरचिटणीस श्री. भिकू बारस्कर सदर कार्यक्रमाला उपस्थित होते . त्यांनी संघाच्या कार्याचा व आजी माजी पदाधिकारी यांच्या कार्याची प्रशंसा केली. केंद्रीय असोसिएशनचे सचिव श्री. पाटील तसेच साप्ताहिक कल्याण नागरिक चे संपादक श्री. मच्छिंद्र कांबळे कार्यक्रमाला उपस्थित होते.

## कल्याणमध्ये खडकपाडा पोलिसांची ड्रग्ज तस्करांवर मोक्का अंतर्गत कारवाई

### 115 किलो गांजा सह 13 आरोपींना अटक, चार आरोपींचा शोध सुरू



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण परिमंडळ 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलिसांनी तब्बल 17 ड्रग्स तस्करांवर मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे. विशेष म्हणजे ठाणे जिल्हातील हि पहिली कारवाई आहे. विशाखापट्टणम ते कल्याण असा पसरलेला अमली पदार्थ तस्करीचे मोठे रॅकेट उध्वस्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी गांजा, वाहने, पिस्तूल, वॉकी-टॉकीसह तब्बल 70 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या टोळीविरोधात महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, पुणे तसेच तेलंगणा राज्यातही अनेक गुन्हे नोंद आहेत. कल्याण जवळील बल्यानी येथे राहणारा गुफारान शेख हा या टोळीचा म्होरक्या राहत होता. खडकपाडा पोलिसांनी गुफारान शेखसह टोळीतील तब्बल 17 जणांविरोधात मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे.

खडकपाडा पोलीस स्टेशनमध्ये अंमली पदार्थ विरोधी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयात पोलीस उप आयुक्त यांच्या विषेश कार्यवाही पथकाकडुन तपास करण्यात आला. उपायुक्त अतुल झेंडे यांच्या सूचनेप्रमाणे सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमर वाघमोडे, पोलीस उपायुक्त पथकातील अधिकारी अनिल गायकवाड यांच्या पथकाने या रॅकेटचा तपास सुरू केला. या तपासात राज्यात्तील तसेच राज्याबाहेरील विवीध भागातुन एकुण १३ आरोपींना अटक करण्यात आली असुन त्यामध्ये विशाखापट्टणम, आंध्र प्रदेश येथुन आरोपींच्या ताब्यातुन एकुण ६२ किलो ग्रॅम वजनाचा गांजा, १ पिस्टल, २ जिवंत काडतुस व २ वॉकीटॉक संच चार्जरसह असे पंचनाम्यांतर्गतजप्त करण्यात आले. अटक केलेल्या १३ आरोपींच्या ताब्यातुन एकुण ११५ किलोग्रॅम गांजासह सुमारे ७० लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या गुन्हयातील आरोपी आर्थीक लाभासाठी संघटीत गुन्हेगारी करत असल्याचे निष्पन्न झाल्याने ठाणे पोलीस आयुक्तालयात नमुद गुन्हयातील १७ आरोपींविरुद्ध मोक्का प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. गुफरान हन्नान शेख हा सदर टोळीचा टोळी प्रमुख असुन, त्याचे इतर १६ साथीदार या गुन्हयात सहभागी आहे. या आरोपींमध्ये गुफरान शेख, बाबर शेख, सुनिल राठोड, आझाद शेख, रेश्मा शेख, शुभम उर्फ सोन्या भंडारी, असिफ शेख, सोनु सय्यद, प्रथमेश नलवडे, रितेश गायकवाड, अंबादास खामकर, आकाश भिताडे, योगेश जोध यासह इतर आणखी ४ आरोपींचा यामध्ये समावेश आहे.

हि कारवाई अपर पोलीस आयुक्त संजय जाधव याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त अतुल झेडे यांच्या सुचनेप्रमाणे करण्यात आली असुन या गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे हे करत आहेत.

## भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा आज बंद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना कळविण्यांत येते की, जुनी भिवंडीला पाणी पुरवठा करणारी मानसरोवर येथील मेन लाईन शिफ्टींचे काम हाती घेण्यात येणार असल्याने वार शनिवार दिनांक ११/१०/२०२५ सकाळी ९.०० वाजे पासून ते वार रविवार दि. १२/१०/२०२५ सकाळी ९.०० वाजे पर्यंत २४ तासांकरीता पाणी पुरवठा बंद राहणार असून पुढील एक दिवस कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे. तरी पद्मानगर, गायत्रीनगर, रामनगर, नवजीवन कॉलनी, बीएनएन कॉलेज रोड, पटेल कंम्पाऊंड गल्ली नं. १,२,३, भैयासाहेब आंबेडकरनगर, न्युप्रकाशनगर, माधवनगर, सोमानगर, विठ्ठलनगर, गंगाराम वाडी, लकडाचाळ, न्यु टावरे कंम्पाऊंड, दुधबावडी, हाफिजनगर, आलमगीर विडीओ परिसर, न्यु इंस्लामाबाद, आझमीनगर, खालीक शेठ चाळ दिवानशाह, हांडीकंम्पाऊंड समरुबाग, इदगाहरोड, कारीवली रोड, दर्गारोड, मोमिन बाग, कोतवालशाह, मुर्तुजा कंम्पाऊंड, धोबीतलाव, बाबु चुनिवाला बिल्डींग, टावरे वाडी, चारचाळी, हमालवाडा, तंडेल मोहल्ला, बंदर मोहल्ला, सौदार मोहल्ला, मुकरी शाह, सुतारआळी, भोईवाडा, भुसार मोहल्ला, ब्राम्हणआळी, कासारआळी, पोस्ट ऑफिस जवळ, बाजारपेठ, हफसन आळी, जैतुनपूरा, कापतलाव, समदशेठ बगीचा, बंगालपूरा, धोबी मोहल्ला, सोनापूर, तेली मोहल्ला, कॅसरबाग, ठाणारोड, बोबडे मोहल्ला, गौरीपाडा, भुसार मोहल्ला, खजुरपूरा, नाचन कंम्पाऊंड, समदनगर, कणेरी, पायल टॉकीज जवळ, अजंठा कंम्पाऊंड १ व २, धामनकर नाका, वॉटर सप्लाय कॉलनी, ठाणगेआळी, तीनबत्ती, फैजान कंपा., मेहता कंपाउन्ड, रोशनबाग, देऊनगर टावरे कंपाउन्ड, निजामपूरा, विठ्ठलनगर चींचेच्या झाडा जवळ, ग्लोबल कॉप्लेक्स, खालीक शेठ कंम्पाउंड रोषणबाग, येथील नागरीकांनी नोंद घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.







*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*